253

पुण्यनगरी ८ सप्टे १०

# कमला कॉलेजमध्ये महिलाविषयक व्याख्यान

कोल्हापूर, दि. ६ - कमला महाविद्यालयात लैंगिक छळ प्रतिबंधक समितीच्या वतीने ॲडव्होकेट शोभा दोडके (जोशी) यांचे 'महिलाविषयक कायदे' या विषयावर व्याख्यान झाले. प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते.

ॲडव्होकेट शोभा दोडके म्हणाल्या की, महिलांवर अन्याय होऊ नये या विषयी कायदे केलेले आहेत. त्यामध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा, लैंगिक छळ प्रतिबंधक, अनैतिक संबंधाविषयक, कौटुंबिक हिंसाचारासंदर्भात, शारीरिक व मानसिक अत्याचार याबाबतचा कायदा आहे; स्त्रियांनी आपल्यावरील अन्यायाविरुद्ध पेटून उठले पाहिजे. स्वाभिमानाला धक्का लागणार नाही याची काळजी घ्यावी.

प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील म्हणाले, महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थिनींना स्त्रीविषयक कायद्याचे ज्ञान होणे गरजेचे आहे. त्या आधारे त्यांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे सामर्थ्य प्राप्त होईल. प्रा. डॉ. तेजस्विनी मुडेकर (लैंगिक छळ प्रतिबंध समिती अध्यक्षा) यांनी पाहुण्याचा परिचय करून दिला आणि या समितीतर्फे स्त्रियांवर अन्याय होऊ नये यासाठी जाणीव जागृतीचे विविध उपक्रम राबवून मुलींचे प्रबोधन केले जाते, या विषयी विवेचन केले. प्रा. ए. एम. साळोखे यांनी आभार मानले. अपूर्वा भोसले यांनी सूत्रसंचालन केले.



*कमला कॉलेजमधील व्याख्यानात बोलताना ॲडव्होकेट शोभा दोडके (जोशी). व्यासपीठावर प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्रा. डॉ. तेजस्विनी मुडेकर आदी.*